13-03-2025-Dai-01a_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/12/2025 11:40 PM Page 1



आगोंद बीचवर उच्च न्यायालयाचा दणका

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

भाऊसाहेब बांदोडकरांचे कार्य पुढे नेवुया » पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, १३ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 190 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 13 March 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

राजौरीत गोळीबारात जवान जखमी

जम्मू, दि. १२ : जम्मूमधील राजौरी जिल्ह्यातील नौशेरा सेक्टरमध्ये सीमेपलीकडून झालेल्या गोळीबारात एक लष्करी जवान जखमी झाला. मन कुमार बेगा असे या सैनिकाचे नाव आहे. तो गोरखा रेजिमेंटचा आहे. सीमेपलीकडून स्नायपर हल्ला झाला. नियंत्रण रेषेवरही स्फोट झाला, त्यानंतर तीन फेऱ्या गोळीबार झाला. सध्या लष्कराने परिसरात शोध मोहीम सुरू केली आहे. गेल्या २० दिवसांत नियंत्रण रेषेवर गोळीबाराची ही पहिलीच घटना आहे.२१ फेब्रुवारी रोजी भारत आणि पाकिस्तानच्या सैन्यात ध्वज बैठक झाली. पूंछ सेक्टरमधील चाका दा बाग (एलओसी ट्रेड सेंटर) येथे ही बैठक झाली. ज्यामध्ये दोन्ही सैन्याच्या ब्रिगेडियर दर्जाच्या अधिकाऱ्यांनी भाग घेतला. गेल्या चार वर्षांत दोन्ही देशांमधील ही पहिलीच बैठक होती. शेवटची ध्वज बैठक २०२१ मध्ये झाली होती.

१०४ प्रवाशांची सुटका, १६ दहशतवादी ठार!

कराची, दि. १२ :
पाकिस्तानमध्ये बलुच दहशतवाद्यांनी चक्क रेल्वेच हायजॅक केली असून ४८ तासांपासून हा खेळ सुरु आहे. येथे बलूच फुटीरतावादी संघटना बलुच लिबरेशन लष्करी संघटनेने पेशावरला जाणारी जाफर एक्स्प्रेस हायजॅक केली. यानंतर दहशतवाद्यांनी प्रवाशांना ओलीस ठेवले असून पाकिस्तानी सुरक्षा दलांनी बचाव मोहीम सुरू केली. आतापर्यंत १०४ ओलिस प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात आली असून १६ दहशतवादी मारले गेले आहेत, मात्र २३ लोक अजूनही अडकले आहेत. त्यांना वाचवण्यासाठी सुरक्षा दलाचे ऑपरेशन सुरू आहे. जाफर एक्स्प्रेस क्वेट्टाहून पेशावरला जात असताना बलुचिस्तानच्या काछी (बोलान) जिल्ह्यातील पिरोकनारी भागात दहशतवाद्यांनी हल्ला केला. प्रथम रेल्वे रुळावर स्फोट झाला, त्यामुळे खळबळ उडाली. ३० सुरक्षा जवानांना ठार केल्याचा दावाही दहशतवाद्यांनी केला आहे.

तेजप्रताप यादवांना जामीन मंजूर

नवी दिल्ली, दि. १२ : जमिनीच्या बदल्यात 'नोकरी घोटाळा'प्रकरणी बुधवारी दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयाने सर्व आरोपींना ५०,००० रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. सुनावणीवेळी राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजप्रताप यादव आणि मुलगी हेमा यादव उपस्थित होत्या. याआधी २५ फेब्रुवारी रोजी झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने सीबीआयने दाखल केलेल्या अंतिम आरोपपत्राची दखल घेत सर्व आरोपींना समन्स बजावले होते. या प्रकरणात सीबीआयने लालू यादव यांच्यासह इतर ७८ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे.

शेख हसीना यांना मोठा धक्का

ढाका, दि. १२ :
बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या धनमोंडी येथील घरावर तसेच सुदासधन बंगला आणि नातेवाईकांची संपत्ती जप्त करण्याचे आदेश ढाका न्यायालयाने दिले आहेत. त्यासोबतच त्यांच्या नातेवाईकांशी संबंधित १२४ खाती देखील जप्त करण्यात आली आहेत. ढाका न्यायालयाचे विशेष न्यायमूर्ती झाकीर होसेन गालिब यांनी हे आदेश दिले आहेत. शेख हसीन यांचे दिवंगत पती व बांगलादेशचे शास्त्रज्ञ वाझेद मिआ यांच्या नावावर असलेल्या सुदासदन हा बंगला देखील जप्त करण्याचे आदेश दिले आहेत.

हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

तिलारीतील बेकायदा खाणकामावर सरकारचे मौन

गोव्याच्या जलसुरक्षेला गंभीर धोका

पर्यावरणतज्ज्ञांचा सावधतेचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड :

पणजी, दि. १२ : तिलारी धरण क्षेत्रातील बेकायदेशीर खाणकामामुळे गोव्याच्या जलसुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला असून, गोवा सरकारच्या निष्क्रिय भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महाराष्ट्रातील बेकायदेशीर उत्खननामुळे धरणाची पाणी साठवण्याची क्षमता कमी होत असून अब्जावधी लिटर पाणी वाया जात आहे. हे केवळ प्रशासकीय अपयश नसून भविष्यात गोव्यातील जलसुरक्षेवर गंभीर परिणाम करणारा विश्वासघात असल्याची टीका होत आहे.

तिलारी ब्लास्टिंग - सरकार सुशेगाद

तिलारी धरण परिसरात सुरू असलेल्या उत्खननाविरोधात स्थानिक नागरिक आणि पर्यावरण कार्यकर्त्यांनी साखळी उपोषण सुरू केले असून बुधवारी (११ मार्च) या उपोषणाचा सातवा दिवस होता. कार्यकर्त्यांनी सरकारला वारंवार इशारे दिले असतानाही त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र केरकर यांनी वारंवार धोक्याचा इशारा दिला आहे की, तिलारी धरण क्षेत्रातील सततच्या ब्लास्टिंगमुळे धरणाची पाणी साठवण्याची क्षमता कमी होईल आणि परिणामी गोव्यात पाणीटंचाई निर्माण होईल. बुधवारी पर्यावरण कार्यकर्ते रमेश गावस यांनी गोवा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट दिली असता, पाच ते सहा बेकायदेशीर खाणी कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले. इतक्या मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर खाणकाम सुरू असल्याचे पाहून अधिकाऱ्यांना धक्का बसला.

गोवा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीची पाहणी केल्यानंतर सांगितले की, या स्थितीमुळे धरणाच्या संरचनेला गंभीर धोका निर्माण झाला आहे आणि ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे.

रमेश गावस यांनी सांगितले की, गोवा सरकारने तिलारी धरणाच्या बांधकामावर ११०० कोटी रुपये खर्च केले असून महाराष्ट्र सरकारनेही या प्रकल्पासाठी ४०० कोटी रुपये गुंतवले आहेत. तिलारी धरणातून पेडणे, डिचोली आणि बार्देश या उत्तर गोव्यातील तीन महत्त्वाच्या तालुक्यांना पाणीपुरवठा केला जातो. बेसाल्ट खाणीतील स्फोटांमुळे धरणाच्या संरचनेला धोका निर्माण होऊ शकतो आणि याचा थेट परिणाम गोव्याच्या पर्यटन केंद्रस्थानी असलेल्या बार्देश तालुक्याच्या पाणीपुरवठ्यावर होण्याची शक्यता आहे. तिलारी धरणातून गोव्याला दररोज २,४०,००० घनमीटर पाणीपुरवठा केला जातो. जर हे बेकायदेशीर उत्खनन सुरू राहिले, तर गोव्याला भविष्यात मोठ्या जलसंकटाला सामोरे जावे लागेल, असा इशारा गावस यांनी दिला.

तिलारी कालवा वारंवार फुटण्याच्या घटनांमुळे अब्जावधी लिटर पाणी वाया जात आहे. ही स्थिती केवळ प्रशासनाच्या अपयशाचे नव्हे, तर सरकारी धोरणांच्या कमकुवतपणाचे प्रतीक असल्याचे स्पष्ट झाले आहे. जलसुरक्षेवरील हा धोका गोव्याच्या पर्यटन उद्योगालाही फटका देऊ शकतो. पुरेशा पाणीपुरवठ्याशिवाय हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर पर्यटन व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता आहे. परिणामी, गोव्याची अर्थव्यवस्था कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक कार्यकर्ते राजन शेट्ये यांनी सांगितले की, शिरंगे आणि खानयाळे या गावांमधून पूरधोक्यामुळे रहिवाशांना आधीच स्थलांतरित करण्यात आले आहे. मात्र, पूरप्रवण भागात उत्खनन सुरू राहिल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील.

उपोषणकर्त्यांनी गोवा सरकारने महाराष्ट्र सरकारवर दबाव टाकून हे उत्खनन तातडीने थांबवावे, अशी मागणी केली आहे. गोवा सरकारने तिलारी धरणासाठी मोठ्या प्रमाणावर निधी गुंतवलेला आहे. त्यामुळे हे उत्खनन थांबवण्याची जबाबदारी गोवा सरकारची आहे, असे उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

गोवा सरकारला याबाबत वारंवार इशारे देण्यात आले असले तरी, सरकारने केवळ दुर्लक्ष केले आहे. शेजारील राज्ये गोव्याच्या जलसुरक्षेला धोका निर्माण करत असताना सरकार शांत का आहे, असा सवाल संतप्त स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

गोव्याच्या जलसुरक्षेवर संकट निर्माण झाले असताना, सरकारच्या निष्क्रियतेमुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. या परिस्थितीवर त्वरित उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात गोव्याला गंभीर जलसंकटाला सामोरे जावे लागेल, असा इशारा पर्यावरणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

पांडुरंग मडकईकरप्रकरणी पोलिस अधिकाऱ्यांना नोटीस

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १२ : माजीमंत्री पांडुरंग मडकईकर यांच्याविरोधातील लाचखोरीच्या आरोपांप्रकरणी पणजी जिल्हा आणि सत्र न्यायालयाने पोलिस अधीक्षक (एसपी) आणि पोलिस निरीक्षक (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) यांना नोटीस बजावल्या आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे. सात याचिकाकर्त्यांनी असा दावा केला आहे की, मडकईकर यांनी फाईल मंजुरीसाठी १५ ते २० लाख रुपये दिल्याचा आरोप केला आहे. तसेच, गोव्यातील सर्व मंत्री लाच घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याचिकाकर्ते काशिनाथ शेट्ये यांनी सांगितले की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली की मडकईकर यांनी १५ ते २० लाख रुपये दिल्याचे सांगितले आहे. हा प्रकार भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत येतो. जर कोणी हे पैसे घेतले असतील, तर त्याच्यावर कारवाई व्हावी आणि दोषींना तुरुंगात पाठवले पाहिजे. आम्ही आधी पोलिस निरीक्षकाकडे तक्रार दिली होती, परंतु कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे आम्ही एसपीकडे तक्रार केली. अखेर आम्ही नवीन भारतीय न्याय संहिता अंतर्गत सत्र न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी केली आणि एफआयआर दाखल का केला गेला नाही, यासंदर्भात पोलिसांना नोटीस बजावल्या.

याचिकाकर्त्यांपैकी इनासियो डोमिनिक परेरा यांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की , माजी मंत्री पांडुरंग मडकईकर यांचे विधान अस्वस्थ करणारे आहे. गोव्यात कोणतेही काम लाच दिल्याशिवाय होत नाही, असे स्पष्ट होते. जर माजी मंत्र्यांनाही लाच द्यावी लागत असेल, तर सामान्य नागरिकांचे काय

पान २ ▶

विधिमंडळाची बैठक सरदेसाई यांनी टाळली

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १२ : फातोर्डाचे आमदार आणि गोवा फॉरवर्ड पार्टीचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांनी सरकारवर विधानसभा अधिवेशनांची प्रक्रिया केवळ औपचारिकता बनवून लोकशाही जबाबदारी कमी केल्याचा आरोप केला आहे. विधानसभेच्या सभापतींना लिहिलेल्या पत्रात सरदेसाई यांनी व्यवसाय सल्लागार समिती (बीएसी) च्या घाईघाईने घेतल्या जाणाऱ्या बैठकींवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

सरदेसाई यांनी पत्रात नमूद केले की, विषाणू संसर्गामुळे मी आजारी असून, आजच्या बीएसी बैठकीला उपस्थित राहू शकत नाही याबद्दल खेद आहे. मात्र, या बैठकीत केवळ औपचारिकता म्हणून घेतल्या जात असल्याबद्दल मी तीव्र निषेध व्यक्त करतो. त्यांनी लहान आणि अपूर्ण विधानसभा अधिवेशनांवर टीका करत ते गोवा विधानसभेच्या इतिहासात अभूतपूर्व आणि लोकशाहीसाठी धोकादायक असल्याचे म्हटले आहे.

सरदेसाई यांनी विधानसभेत गंभीर मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी अपुरा वेळ दिला जात असल्याचे अधोरेखित केले. बहुमत असूनही, सरकार सखोल चर्चा टाळून विधानसभेचे कामकाज मर्यादित का करत आहे हे समजत नाही. अशा लहान अधिवेशनांमुळे महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करणे अशक्य होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

सरदेसाई यांनी प्रश्नोत्तरांच्या प्रक्रियेवरही आक्षेप घेतला. पूर्वी, सत्ताधारी आणि विरोधी आमदारांना आलटून पालटून प्रश्न विचारण्याची संधी मिळत असे. मात्र, आता लॉट सिस्टीममुळे सत्ताधारी पक्षाला वर्चस्व मिळते आणि विरोधी पक्षांना संधी नाकारली जाते. यामुळे मौल्यवान वेळ वाया जातो, असे ते म्हणाले.

सरदेसाई यांनी विधानसभेच्या कामकाजाच्या दिवसांची कमतरता अधोरेखित केली. दरवर्षी किमान ५० दिवस कामकाज अपेक्षित असताना गोव्यात त्यापेक्षा खूपच कमी दिवस कामकाज चालते. हे लोकशाही मूल्यांचे उल्लंघन असून, अर्थपूर्ण चर्चा रोखण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी मतदानाच्या २४ तास आधी विधेयके सादर केल्याबद्दलही नाराजी व्यक्त केली. यामुळे आमदारांना संशोधन, विश्लेषण आणि सुधारणा प्रस्तावित करण्यासाठी वेळ मिळत नाही, ज्यामुळे कायदेविषयक छाननीला फटका बसतो, असे सरदेसाई म्हणाले.

सरदेसाई यांनी विधानसभेच्या कामकाजात सुधारणा करण्याची मागणी केली. त्यांनी सभापतींना विनंती केली की, राज्यपाल आणि

पान २ ▶



रमजान असो, वा रामनवमी लाला की बस्ती हटणारच

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ मंत्री नीळकंठ हळर्णकरांकडून स्पष्ट

पणजी, दि. १२ : 'रमझान असो किंवा रामनवमी असो, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे 'लाला की बस्ती' पाडण्याच्या आदेशाची कार्यवाही होईलच. कोणत्याही परिस्थितीत दिलासा मिळणार नाही. कोमुनिदाद प्रशासक आवश्यक त्या यंत्रणांच्या मदतीने लाला की बस्ती पाडण्याची कार्यवाही करेल,' असे मच्छीमार खात्याचे मंत्री नीळकंठ हळर्णकर यांनी बुधवारी सांगितले.

आमदार नीलकंठ हळर्णकर यांनी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, कोमुनिदादच्या सदस्यांनी लाला की बस्ती येथील कोमुनिदाद भागातील जमीन विकत घेतल्याचा वाद उच्च न्यायालयात नेला होता आणि वर्ष २०१०मध्ये ही वस्ती पाडली जाणार होती, मात्र एका न्यायालयातून दुसऱ्या न्यायालयात गेल्याने ही

पान २ ▶

गोव्यातील तरुणाची म्यानमारमधून सुटका

कॉल सेंटरमध्ये नोकरी देण्याच्या निमित्ताने फसवणूक

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १२ : थायलंडमध्ये नोकरीचे आश्वासन देऊन म्यानमारमध्ये कॉल सेंटरमध्ये नोकरी देण्याच्या आमिषाने अडकवण्यात आलेल्या गोव्यातील तिसवाडी तालुक्यातील २८ वर्षीय तरुणाची अखेर सुटका झाली. परराष्ट्र मंत्रालयाने केलेल्या प्रयत्नांनंतर त्याला बुधवारी भारतात परत आणण्यात आले. हेराल्डशी बोलताना संबंधित तरुणाने आपले अनुभव कथन केले.

संबंधित तरुणाने नाव गोपनीय ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. त्याने सांगितले की, जानेवारीमध्ये त्याला थायलंडमधील कॉल सेंटरमध्ये नोकरीची जाहिरात इन्स्टाग्रामवर दिसली. बेंगळुरूमधील एका एजंटशी त्याचा संपर्क झाला आणि गुगल मीटद्वारे त्याची मुलाखत झाली. कोणताही थेट संवाद न होता, एजंटने त्याला थायलंडला जाण्यासाठी विमानाचे तिकीट पाठवले.

१४ जानेवारीला तो आणि त्याचा एक मित्र बँकॉकला पोहोचले. तेथून त्यांना एका रिसॉर्टमध्ये ठेवण्यात आले. दुसऱ्या दिवशी त्यांना म्यानमारच्या सीमेजवळ नेण्यात आले. सीमेजवळ दोन्ही देशांच्या सैन्यातील चांगले संबंध दिसून येत होते, त्यामुळे संशय आला. मात्र, भाषेचा अडथळा आणि भीतीमुळे कोणताही प्रश्न विचारला गेला नाही.

सीमेपासून दोन-तीन किलोमीटर अंतरावर के. के. पार्क या परिसरात त्यांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली. तेथून २०० मीटर अंतरावर असलेल्या जक्सी ग्रुप कंपनीत काम करण्यासाठी त्यांची नेमणूक करण्यात आली. कॉल सेंटरमध्ये १४ तास कामाची वेळ होती. आठवडाभर सुट्टी नव्हती. फक्त महिन्याला एक दिवस सुट्टी आणि दर १५ दिवसांनी अर्धा दिवस आराम मिळत असे.

काम सुरू केल्यानंतर त्याला संशय येऊ लागला. जक्सी ग्रुपसह के के पार्कमध्ये सुमारे १०० कंपन्या कार्यरत होत्या, ज्या अमेरिकन नागरिकांना संपर्क साधून गुंतवणुकीसाठी प्रवृत्त करत होत्या. हा एक मोठा घोटाळा असल्याची जाणीव त्याला झाली.

आमच्यावर कोणत्याही प्रकारचा शारीरिक किंवा मानसिक त्रास देण्यात आला नाही. दर १५ दिवसांनी आमचे बेडशीट आणि स्वच्छतागृहाची व्यवस्था केली जात होती. मात्र, आम्ही बेकायदेशीररित्या काम करत असल्याचे स्पष्ट होते, असे संबंधित तरुणाने सांगितले. ४ फेब्रुवारीला त्यांना भारतासह इतर देशांच्या सैन्याकडून सुटकेचा संदेश मिळाला. भारतासह विविध देशांतील एकूण ३५० जणांची सुटका करण्यात आली. सुटका झाल्यानंतर त्यांना एका छावणीत ठेवण्यात आले. तेथे १६ दिवस राहिल्यानंतर त्याला मायदेशी परत आणण्यात आले. मंगळवारी रात्री दिल्ली विमानतळावर पोहोचल्यानंतर पीएसआयच्या सोबत तो घरी पोहोचला.

या कामासाठी त्याला दोन महिन्यांचा टूरिस्ट व्हिसा आणि एक वर्षाचा करार देण्यात आला होता. जर करार मोडला असता, तर त्याला सुमारे ३,६०० अमेरिकन डॉलर्स (सुमारे ३-४ लाख रुपये) दंड भरावा लागला असता. ओव्हरस्टे केल्यास म्यानमारमध्ये एक वर्षासाठी बंदी घालण्यात आली असती. गोव्यात इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये काम करणाऱ्या या तरुणासाठी ही पहिली परदेशातील नोकरी होती. आता तो प्रवासी जहाजावर अभियंता म्हणून काम सुरू करण्याचा विचार करत आहे.

युद्धबंदीसाठी युक्रेन तयार

वॉशिंग्टन दि. १२ : मागील तीन वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया यांच्यातील युद्ध काही दिवसांसाठी थांबणार आहे. बुधवारी युक्रेनने रशियासोबतच्या तीन वर्षांच्या युद्धात पहिल्यांदाच युद्धबंदीवर सहमती दर्शवली आहे. सौदी अरेबियामध्ये अमेरिकेसोबत झालेल्या चर्चेदरम्यान युक्रेनने रशियासोबत ३० दिवसांच्या युद्धबंदीवर सहमती दर्शवली आहे.

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी म्हटलं आहे की, आता ते या प्रस्तावासह रशियाला जातील आणि ते मॉस्कोने ठरवायचे आहे, असे त्यांनी म्हटले आहे. यासोबतच अमेरिका युक्रेनच्या मदतीने गुप्तचर माहितीची देवाणघेवाण पुन्हा सुरू करेल.

दरम्यान, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात ओव्हल ऑफिसमध्ये झालेल्या जाहीर वादानंतर जेद्दाह येथे झालेली चर्चा ही दोन्ही देशांमधील पहिली अधिकृत बैठक होती. याठिकाणी युक्रेनच्या प्रतिनिधींनी अमेरिकेचा प्रस्ताव स्वीकारला आहे. यामध्ये तात्काळ ३० दिवसांचा युद्धविराम करण्याची मागणी करण्यात आली होती.

चर्चेत सहभागी असलेले अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो

पान २ ▶

परवान्यांवर बंदीबाबत रेंट-ए-कार मालकांची नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १२ : उत्तर गोवा रेंट-ए-कार मालकांनी बुधवारी राज्य सरकारकडे रेंट-ए-कॅब परवान्यांच्या नूतनीकरण, बदली आणि नवीन परवानग्या थांबवण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली.

परिवहन विभागाकडून त्यांच्या कॅबचे नूतनीकरण आणि बदली परवानग्या मिळवण्यासाठी आलेल्या कॅब मालकांना राज्य परिवहन प्राधिकरणाने पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व परवाने थांबवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले. मात्र, या संदर्भात कोणतीही अधिकृत सार्वजनिक सूचना जारी करण्यात आलेली नाही, असा आरोप कॅब मालकांनी केला आहे.

आम्ही आमच्या वाहनांमध्ये व्हेइकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस आणि स्पीड गव्हर्नर बसवले आहेत. आम्ही पहिल्यांदाच बदलीसाठी अर्ज करत नाही आहोत, यापूर्वीही असे घडले आहे. आम्हाला दरमहा कर्जाचे हप्ते भरावे लागतात, त्यामुळे परवान्यांच्या नूतनीकरणावर बंदीमुळे आम्हाला मोठा आर्थिक फटका बसत आहे, असे कॅबमालक नितीन कुंकळेकर यांनी सांगितले.

नितीन नार्वेकर या दुसऱ्या कॅब मालकाने आरोप केला की, सरकारने आवश्यक असलेली सर्व उपकरणे बसवूनही आम्हाला त्रास दिला जात आहे. विमानतळांवरून सेवा थांबवण्याच्या आदेशांचे पालन करूनही परवान्यांचे नूतनीकरण केले जात नाही. मद्यप्राशन करून गाडी चालवण्याच्या आणि भाड्याने घेतलेल्या वाहनांच्या वाढत्या अपघातांच्या घटनांनंतर सरकारने रेंट-ए-कारवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला होता. परिवहन संचालनालयाने २० फेब्रुवारी रोजी विमानतळ आणि रेल्वे स्थानकांवरून रेंट-ए-कार सेवा चालवण्यास बंदी घालणारी नोटीस जारी केली होती. नियमांचे उल्लंघन केल्यास परवाने रद्द करण्याचा इशारा देण्यात आला होता. तथापि, १९८९ च्या रेंट-ए-कॅब योजना अंतर्गत निश्चित केलेल्या अटी आणि मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करून विमानतळ आणि रेल्वे स्थानकांवर अनधिकृतपणे अनेक रेंट-ए-कार वाहने आढळून आल्याचे समोर आले आहे. चालकांना केवळ त्यांच्या परवान्यांत नोंदणीकृत मुख्य कार्यालयातून किंवा नियुक्त शाखा कार्यालयांमधून सेवा देण्यास सांगण्यात आले आहे.

उत्तर गोवा रेंट-ए-कॅब असोसिएशनच्या सदस्यांनी जर आठ दिवसांत सरकारने विमानतळ आणि रेल्वे स्थानकांवरील बंदी उठवली नाही, तर कायदा हातात घेण्याचा इशारा दिला आहे. असोसिएशनच्या प्रतिनिधींनी परिवहन उपसंचालकांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.